# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक एसईसी/जीईएन/११९६/सीआर-१७/का-३.
नवीन प्रशाकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ४ मार्च, १९९६.

प्रति,
आयुक्त महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व बृहन्मुंबई वगळून)

विषय–नगरपालिका निवडणुका.
मतदार यादी तयार करणे.

महानगरपालिका व नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी संबंधित कायद्यातील तरतुदीप्रमाणे राज्य निवडणूक आयुक्त, जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ही नगरपालिका क्षेत्राची प्रारुप मतदार यादी तयार करण्यासाठी विचारात घ्यावयाची आहे. त्यानंतर कायद्यातील तरतुदीप्रमाणे विहीत मुदतीमध्ये आलेल्या अर्जावर निर्णय घेवून नावे समाविष्ट करणे, नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात बदलणे किंवा कमी करणे ही कार्यवाही करून मतदार यादी अंतिमरित्या प्रसिद्ध करावयाची होती. परंतु या संदर्भात येणाऱ्या अडचणी व घडणाऱ्या त्रुटींचा विचार करून तसेच त्यासंदर्भात ग्रामपंचायत कायद्यात असलेल्या तरतुदींचा विचार करून शासनाने महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११/१९९६, दिनांक २९ जानेवारी, १९९६ अन्वये, महानगरपालिकेच्या संबंधित कायद्यात त्याचप्रमाणे नगरपरिषदांच्या कायद्यात पूर्वीच्या यासंदर्भातील तरतुदी रद्द करणेत आल्या असून, नवीन तरतुदींप्रमाणे **राज्य निवडणूक आयुक्त जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी नगरपालिका क्षेत्रासाठी प्रभागनिहाय मतदार यादी तयार करून ती प्रमाणित करावयाची आहे व अशी मतदार यादी ही निवडणुकीसाठी वापरावयाची आहे.** सदर अधिनियमाच्या प्रती नगरविकास विभाग यांचेकडील पृष्ठांकन क्रमांक एमएमसी-१०९५/प्र.क्र. ५४/९५ नवि-३२, दिनांक ७ जानेवारी, १९९६ अन्वये सर्व महानगरपालिका आयुक्त यांना व इतर अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी यांना प्रत न पाठविणेत आल्याने अधिनियम क्रमांक ११/१९९६ ची प्रत (इंग्रजी व मराठी) यासोबत जोडणेत आली आहे.

२. मतदार यादी करीत असतांना ती काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, **विधानसभा मतदार यादी तयार करतांनासुद्धा त्यामध्ये काही वेळा त्रुटी राहून जातात, किंवा विधानसभा मतदार क्षेत्राच्या सिमालगतच्या मतदारांची नोंदणी केली जाते, काही वेळा मतदार मयत झालेला असला तरी त्याचे नाव मतदार यादीत कायम असल्याचे, तसेच एका पेक्षा जास्त प्रभागांत मतदाराची नोंदणी करून घेतल्याचे, किंवा महानगरपालिका अथवा नगरपरिषदेच्या हद्दीलगतच्या ग्रामीण भागांतील काही इसमांची नावे मतदार म्हणून महानगरपालिका अथवा नगरपरिषद क्षेत्रातील प्रभागांत नोंदणी करून घेतल्याचे आढळते.** मतदार यादीच्या संदर्भात येणाऱ्या तक्रारी टाळण्यासाठी नगरपालिकांची मतदार यादी योग्य प्रकारे तयार करणे आवश्यक आहे, तसेच त्यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी राहणार नाही अशी दक्षता घेणे अपेक्षित आहे.

३. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम २२ अन्वये मतदार यादी दुरुस्त करण्याची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीकडे आपले लक्ष वेधण्यात येते. सदर तरतुदी विचारात घेता मतदार नोंदणी अधिकारी यांना, जर त्यांना काही मतदारांच्या नोंदी चुकीच्या आहेत, असे आढळल्यास योग्य ती चौकशी करून संबंधित मतदाराचे म्हणणे ऐकून घेवून, मतदार यादी दुरुस्त करण्याची आहे. ही तरतुद विचारात घेता महानगरपालिकेचे आयुक्त यांनी महानगरपालिका क्षेत्राच्या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी संबंधित अधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेवून संबंधित महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेल्या मतदार यादींची छाननी करून परिच्छेद २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे काही नावे आढळल्यास ती कमी करण्याची/दुरुस्त करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठवावा, व त्याची प्रत संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे पाठवावी.

४. त्याचप्रमाणे नगरपरिषदांच्या संदर्भामध्ये जिल्हाधिकारी यांनी मुख्याधिकारी यांना वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्या, व ते योग्य ती कार्यवाही करीत आहेत याची खात्री करावी. नगरपरिषदांचे मुख्याधिकारी यांनी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्याकडे पाठविलेल्या प्रस्तावांची प्रत त्यांचेकडून जिल्हाधिकारी यांनी मागून घ्यावी व एखाद्या जबाबदार अधिकाऱ्यामार्फत मतदार यादी योग्य प्रकारे दुरुस्त करून अद्यावत् केलेली आहे का कसे याची खात्री करावी. महानगरपालिकांचे आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी अनुक्रमे महानगरपालिका व नगरपरिषदांसाठी जी मतदार यादी तयार केली जाईल त्यात कोणत्याही प्रकारच्या त्रुटी राहणार नाहीत अशी काळजी घ्यावी, म्हणजे हितसंबंधी लोकांनी संबंधित अधिकाऱ्याशी हातमिळवणी करून सदोष मतदार याद्या तयार करण्याच्या वृत्तीस आळा बसून भविष्यात मतदार यादीच्या संदर्भात या बाबीविषयी तक्रार उद्‌भवणार नाही.

(सही) ....

(दे. ना. चौधरी),
राज्य निवडणूक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

---

**प्रत अग्रेषित :**

(१) विभागीय आयुक्त (सर्व), (आवश्यक त्या कार्यवाहीसाठी).

(२) सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.